दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ५ वे अंक १७ बुधवार दि.१६ जूलैं २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## 'मोदीजींशी वैर नाही, पण नितीशजींची खैर नाही' ; चिराग पासवान पुन्हा २०२० च्या भूमिकेत परतले?



बिहारच्या राजकारणात चिराग पासवान यांची भूमिका पुन्हा एकदा महत्त्वाची बनली आहे. सर्वांच्या नजरा एलजेपी (रामविलास) वर आहेत. कारण एनडीएमध्ये असूनही चिराग जी पाऊल उचलत आहेत त्यामुळे अनेक लोकांना धडकी भरली आहेत. बिहारमधील कायदा आणि सुव्यवस्थेच्या परिस्थितीवरून चिराग ज्या प्रकारे नितीश कुमार यांना घेरत आहेत, त्यावरून ते एनडीएसोबत आहेत असे वाटत नाही. केंद्रीय मंत्री आणि हिंदुस्तानी अवाम मोर्चा (धर्मनिरपेक्ष) नेते जीतन राम मांझी हे बिहारच्या राजकारणातील एनडीएचे प्रमुख व्यक्तिमत्त्व आहेत.

बिहारमधील कायदा आणि सुव्यवस्थेबाबत नितीश कुमार यांच्यावर वारंवार प्रश्न उपस्थित केल्याबद्दल मांझी यांनी चिराग पासवान यांची तुलना महाभारतातील अभिमन्यूशी केली. असे म्हणणे की तरुण नेत्यांना कधीकधी प्रशासनातील गुंतागुंत पूर्णपणे समजत नाही. मांझी म्हणतात की कधीकधी विश्वासार्ह लोकही परिस्थिती समजून घेत नाहीत आणि विधाने देतात. चिराग पासवान हे एनडीएमध्ये चांगले नेते आहेत, पण ते तरुण आहेत. तरुणांना कधीकधी बारकावे समजत नाहीत. अभिमन्यू पूर्ण ताकदीने पुढे सरकला, पण काहीतरी कमी पडत होते. मांझीचे शब्द लक्ष देण्यासारखे आहेत. पण खरा प्रश्न असा आहे की, चक्रव्यूहात प्रवेश करण्यासाठी चिरागला दुसऱ्या कुठून तरी पाठिंबा मिळत आहे का?

यामुळेच लोकांना बिहारमध्ये २०२० चा नारा आठवत आहे – मोदीजींशी वैर नाही, नितीशकुमार तुमची खैर नाही . चिरागची विधाने आणि त्याच्या योजना पाहून लोक विचारत आहेत की चिराग पासवान खरोखरच जुन्या मार्गावर परतत आहेत का? हा भाजपच्या रणनीतीचा भाग आहे का, असा प्रश्नही उपस्थित केला जात आहे. २०२० च्या विधानसभा निवडणुकीत काय घडले? २०२० च्या बिहार विधानसभा निवडणुकीत चिराग पासवान यांनी त्यांचा पक्ष, लोक जनशक्ती पार्टी (एलजेपी) एनडीएपासून वेगळा केला आणि नितीश कुमार यांच्या विरोधात घोषणा दिली – मोदीजींशी वैर नाही, नितीशकुमार तुमची खैर नाही. नितीश कुमार यांना नुकसान पोहोचवण्यासाठी चिरागने हा निर्णय घेतला होता हे स्पष्ट आहे. या रणनीतीअंतर्गत, चिरागने १३७ जागांवर जेडीयूविरुद्ध उमेदवार उभे केले, परंतु भाजपविरुद्ध एकही उमेदवार उभा केला नाही. चिरागची ही रणनीती कामी आली.

जेडीयूच्या जागा ११५ वरून ४३ पर्यंत कमी झाल्या आणि आता हा पक्ष एनडीए आघाडीतील धाकटा भाऊ बनला आहे. कारण भाजपने ७४ जागा जिंकून युतीमध्ये आपले स्थान मजबूत केले होते. नितीश कुमार यांचे हे स्वतःचे व्यक्तिमत्व होते की एवढे सगळे असूनही भाजप त्यांना बाजूला करू शकले नाही.

बिहारमध्ये पुन्हा एकदा सरकार स्थापन झाले आणि नितीश यांना चेहरा म्हणून निवडण्यात आले. मात्र, बिहारमध्येही लोजपाला पराभव पत्करावा लागला. चिरागच्या पक्षाला फक्त एकच जागा मिळाली. अर्थात, जर चिरागने एनडीमध्ये राहून निवडणूक लढवली असती तर त्याच्या जागा किमान दुहेरी अंकात असत्या. पण नंतर त्यांना केंद्रीय मंत्र्याच्या रूपात नितीश यांना कमकुवत करण्याचा फायदा मिळाला. चिराग वारंवार स्वतःला पंतप्रधान नरेंद्र मोदींचा हनुमान म्हणवून घेत होते आणि भाजपप्रती निष्ठा दाखवत होते, त्यामुळे चिरागची रणनीती कुठेतरी भाजपच्या इशाऱ्यावर होती असा संदेश समोर आला. २०२५ मध्ये जुनी घोषणा, नवीन रणनीती?

२०२५ च्या बिहार विधानसभा निवडणुकीच्या तयारीत चिराग पासवान पुन्हा एकदा चर्चेत आहेत. यापूर्वी, चिरागने सर्व २४३ जागांवर निवडणूक लढवणार असल्याचे सांगून सर्वांच्या भुवया उंचावल्या होत्या. एनडीएच्या आत आणि बाहेर खळबळ उडाली.

चिराग पासवान आता एनडीएचा भाग आहेत आणि केंद्रातील मोदी सरकारमध्ये अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री आहेत. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांच्या पक्षाने बिहारमधील वाटप केलेल्या पाचही जागा जिंकल्या, ज्यामुळे त्यांचे राजकीय स्थान वाढले आहे.

## कोकणातील वीज प्रश्नांवर आ. निलेश राणे आणि आ. शेखर निकम यांची ठाम भूमिका; वीज ग्राहकांना न्याय मिळावा यासाठी सरकारकडे मागणी



मुंबई / प्रतिनिधी : पावसाळी अधिवेशनात आ. निलेश राणे व आ. शेखर निकम यांनी ऊर्जा विभागावरील चर्चे दरम्यान महावितरण संदर्भात काही प्रश्न उपस्थित करून शासनाचे लक्ष वेधले होते. या अनुषंगाने कोकण विभागातील ऊर्जा विभागाच्या आढावा बैठकीत वीज ग्राहकांच्या अडचणी शासनाच्या निदर्शनास आणून दिल्या. कोकणातील शेती, उद्योग, नागरिक, जनावरांचे जीवित नुकसान आणि आर्थिक अडचणी यांचा सखोल उल्लेख करीत त्यांनी तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली.

बैठकीत खालील प्रमुख मुद्दे उपस्थित करण्यात आले;

पारंपरिक शेती वीज कनेक्शन

शेतकऱ्यांनी पैसे भरून घेतलेली कनेक्शन पूर्ण करूनही महावितरणने सिस्टिम लॉक केल्यामुळे त्यांचे बिल तयार होत नाही. ठेकेदारांची बिलेही प्रलंबित आहेत. ही सिस्टिम अनलॉक करून ग्राहकांना कनेक्शन व ठेकेदारांना बिले मिळावीत, अशी मागणी करण्यात आली.

छडउ योजनेत रखडलेली कामे

शंभराहून अधिक ग्राहकांनी पैसे भरूनही कामे निधीअभावी रखडली आहेत. त्यामुळे नागरिक अंधारात आहेत. तात्काळ निधी उपलब्ध करून कामे पूर्ण करावीत.

डोंगराळ भागातील वीज पुरवठा

वादळवाऱ्यामुळे वारंवार तुटणाऱ्या लाईनसाठी वेळेवर आणि पुरेसा निधी उपलब्ध करून ग्राहकांना अंधारातून वाचवावे. चिपळूण शहरातील विद्युत वाहिन्या अंडरग्राऊंड कराव्यात पुरामुळे विद्युत तारा तुटून अपघात होतात. जनतेच्या सुरक्षेसाठी सर्व लाईन अंडरग्राऊंड कराव्यात, अशी ठाम मागणी.

स्मार्ट मीटरचा त्रास

स्मार्ट मीटर बसविल्यानंतर बिल वाढल्याच्या तक्रारी असून, तपासणी सुविधा नसल्याने ग्राहक भरकटत आहेत. तपासणी यंत्रणा नसतानाच जबरदस्तीने मीटर बदल थांबवावेत.

वीज अपघातांमुळे जीवित व वित्त हानी

वीज वाहिन्यांची गार्डिंग न केल्यामुळे जनावरांचा मृत्यू व नागरिकांचे नुकसान होत आहे. अशा घटनांसाठी सरकारने स्पष्ट धोरण व नुकसान भरपाईचे निकष ठरवावेत.

ग्राहकांनी स्वखर्चातून घेतलेली कनेक्शन

ग्राहकांनी स्वतःच्या खर्चाने वीज कनेक्शन घेतल्यावरही महावितरणकडून त्यांना अनावश्यक सेवा शुल्क लावले जाते. हा अन्याय थांबवावा व संपूर्ण खर्च एकाचवेळी परत करावा.

सौरऊर्जा प्रकल्पाचे विमा संरक्षण

वादळवाऱ्यामुळे सौर पॅनल्सचे नुकसान होत असले तरी विमा कंपन्या भरपाई देत नाहीत. सौर प्रकल्पांनाही विमा संरक्षण मिळाले पाहिजे.

स्मार्ट प्रकल्पांसाठी ट्रान्सफॉर्मर मंजुरीत सवलत व गती

शेतकरी उत्पादक कंपन्यांचे प्रकल्प ट्रान्सफॉर्मर सिक्युरिटी डिपॉझिटमुळे अडकले आहेत. -G Others गटातून मंजुरी देऊन सवलत द्यावी, आणि मंजुरी एका महिन्यात व्हावी.

यावेळी ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, गृह राज्यमंत्री योगेश कदम, आ. प्रशांत ठाकूर, आ. महेंद्र दळवी, आ. रवी पाटील, आ. दीपक केसरकर तसेच सचिव लोकेशचंद्र, संचालक प्रकल्प महावितरण प्रसाद रेशमे, संचालक संचलन सतीश चौवान, कार्यकारी संचालक महावितरण औंदेकर, मुख्य अभियंता रत्नागिरी परिमंडळ अनिल डोये, मुख्य अभियंता भांडूप परिमंडळ संजय पाटील, अधीक्षक अभियंता सिंधुदुर्ग मंडळ धनराज बिक्कड, प्र. अधिक्षक अभियंता रत्नागिरी मंडळ नितीन परसुले देसाई आदि इतर संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## भाजपाच्या लातूर ग्रामीण मंडळाची नवीन कार्यकारणी जाहीर; नियुक्ती पत्राचे वाटप




लातूर : – भारतीय जनता पार्टीच्या लातूर ग्रामीण मंडळाची कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना नियुक्ती पत्राचे लातूर येथील संवाद कार्यालयात वाटप करण्यात आले. यावेळी सर्व नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यास आमदार कराड यांनी सर्व पदाधिकाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

भाजपाच्या लातूर ग्रामीण मंडळाचे अध्यक्ष प्रताप पाटील यांनी जाहीर केलेल्या लातूर ग्रामीण मंडल पदाधिकाऱ्यात युवा मोर्चा अध्यक्ष – प्रशांत शिंदे, महिला मोर्चा अध्यक्ष – शितल पाटील, अनुसुचित जाती मोर्चा अध्यक्ष – मारुती शिंदे, अल्पसंख्यांक मोर्चा अध्यक्ष – अहमद शेख, ओबीसी मोर्चा अध्यक्ष – शंकर चव्हाण, किसान मोर्चा अध्यक्ष – आदिनाथ मुळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर लातूर ग्रामीण मंडल भाजपा कार्यकारणी योगीराज साखरे, सुधाकर कराड, सुधाकर शिंदे, शरद शिंदे, बापूराव चामले, सुरेखा पुरी, चंद्रकांत वांगस्कर, गोपाळ पाटील, हनुमंत कापरे यांना उपाध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आली आहे.

सरचिटणीसपदी भैरवनाथ पिसाळ, लक्ष्मण नागिमे, बाबासाहेब भिसे, भुजंग काळदाते, श्यामसुंदर वाघमारे, रुपेश थोरमोठे, राम बंडापल्ले, सुरेश मलवाडे यांची तर प्रभाकर माळी, हनुमंत गव्हाणे, रमेश लाडे सचिन लटपटे महानंदा कोद्रे यांना चिटणीस करण्यात आले आहे अशोक सावंत यांच्याकडे कोषाध्यक्ष पदाची जबाबदारी देण्यात आली आहे. लातूर ग्रामीण मंडल कार्यकारणी ४३ जणांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांना भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते नियुक्ती पत्राचे वाटप करण्यात आले. यावेळी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, भागवत सोट, नवनाथ भोसले, पद्माकर चिंचोलकर, बन्सी भिसे, सुरज शिंदे यांच्यासह इतर अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

सर्व नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून भाजप नेते आमदार रमेश आप्पा कराड यांनी पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या व येणाऱ्या काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत सर्वांनी जिद्दीने जोमाने काम करून भारतीय जनता पार्टीच्या विजयाचा पताका फडकवावा असे आव्हान करून गावागावातील वाडी वस्तीतील गोरगरीब सर्वसामान्य गरजूंना शासनाच्या विविध योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत असे आवाहन केले. याप्रसंगी अनेक नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी आमदार कराड यांचा सत्कार करून पक्षाचे काम करण्याची संधी दिल्याबद्दल आभार व्यक्त केले. या कार्यक्रमास भाजपाचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मिलिंद धावारे यांचे निधन



लातूर :- गाव भाग लातूर येथील मिलिंद नगर येथे रहिवासी असलेले काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मिलिंद धावारे यांचे मिलिंद नगर येथील राहत्या घरी मंगळवार दिनांक १५ जुलै रोजी सायंकाळी ७-४५ वाजता दीर्घ आजाराने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ८५ होते. त्यांच्या पश्चात तीन मुले, दोन मुली , जावई, सुना नातू असा परिवार आहे. त्यांचा अंत्यविधी मारवाडी शमशानभूमी येथे बुधवारी दि. १६ जुलै रोजी सकाळी ११ वाजता करण्यात येणार आहे. मिलिंद धावारे हे काँग्रेसचे कट्टर ज्येष्ठ नेते होते. त्यांनी काँग्रेससाठी गावभागामध्ये खूप प्रयत्न करून काँग्रेस पक्षाला मजबूत करण्याचे काम केले. आहे. माजी मुख्यमंत्री लोकनेते स्वर्गीय विलासराव देशमुख, माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्यासोबत खांद्याला खांदा लावून काँग्रेस पक्षाची प्रतिष्ठा वाढवण्याचे काम केले आहे. लातूर जिल्हा काँग्रेस सेवा दलचे जिल्हा सचिव होते. त्यांच्या या दुःखद निधनामुळे मिलिंद नगर येथे हळहळ व्यक्त करण्यात येत आहे. त्यांच्या पश्चात, एक बहीण लता श्रीरंग गायकवाड,तीन मुले धीरज,अश्विन, मनीष, दोन मुली सौ वर्षा गौतम गायकवाड, सौ लीना नितीन कांबळे, दोन सुना दोन जावई, उपप्राचार्य प्रा.गौतम गायकवाड, खोलेश्वर महाविद्यालय अंबाजोगाई यांचे सासरे होते. मिलिंद धावारे यांच्या दुःखद निधनामुळे धावारे परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या या दुःखात दैनिक महावृत्त , संपूर्ण मिलिंद नगर परिवार सहभागी आहे.

## माजी मंत्री अमित देशमुख यांची सुहास कुमार देशमुख यांनी घेतली सदिच्छा भेट



सुहासकुमार हणमंतराव देशमुख अमेरिकेतील जगातील नामवंत मायक्रोसॉफ्ट कंपनीच्या सियटल येथील मुख्यालयातील जनरल मॅनेजर म्हणून कार्यरत असलेले बाभळगांवचे सुपुत्र यांनी नुकतीच महाराष्ट्र राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण तथा लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांची सदिच्छा भेट घेवून आधुनिक माहिती तंत्रज्ञानाबाबत चर्चा केली. यावेळी तिन्ही बंधू उपविभागीय कार्यालय लातूर येथील नायब तहसीलदार सुधीर हणमंतराव देशमुख व सुनिल हणमंतराव देशमुख आदि उपस्थित होते.

## दर्जीबोरगाव सोसायटीचे नुतन चेअरमनसह पदाधिकाऱ्यांचा भाजपा नेते आमदार रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते सत्कार



लातूर : – रेणापूर तालुक्यातील मौजे दर्जीबोरगाव येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे नवनिर्वाचित चेअरमन सदाशिव सुरवसे, व्हाईस चेअरमन अर्जुन माने आणि सर्व सदस्यांचा भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी यथोचित सत्कार करून अभिनंदन केले व पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. लातूर ग्रामीणचे आमदार श्री रमेशआप्पा कराड यांनी लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात दर्जीबोरगाव सोसायटीच्या नवनिर्वाचित चेअरमन सदाशिव सुदर्शन सुरवसे, व्हाईस चेअरमन अर्जुन विठोबा माने आणि सदस्य गोविंद पंढरी माने, रामकृष्ण निवृत्ती बरीदे, राधेश्याम आत्माराम चबिले, सचिन विठ्ठल लोणकर, रतन पंढरी धावारे, रशीद इब्राहिम शेख, लक्ष्मीबाई भानुदास माने यांचा यथोचित सत्कार करून अभिनंदन केले विविध कार्यकारी संस्थेच्या माध्यमातून शेतकऱ्यांची आर्थिक उन्नती व्हावी त्यांच्या जीवनात सुख समाधानाचे दिवस यावेत यासाठी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न करावेत अशा सूचना करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजपाचे माजी अध्यक्ष दशरथ सरवदे, रेणापूरचे माजी नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, श्रीकृष्ण पवार यांच्यासह दर्जी बोरगाव येथील सरपंच रमेश कटके, माजी उपसरपंच गोपाळ सुरवसे, विजयकुमार रेड्डी, अंकुश लोणकर, लक्ष्मण काळे, रमेश स्वामी, सुरेश कटके, गोविंद सुरवसे, अमृत गाडेकर, गोकुळ सुरवसे, कुंडलिक सुरवसे, विष्णू सुरवसे, रावण धावारे, निजाम शेख यांच्यासह अनेक जण होते.

## सुहासकुमार देशमुख यांनी सहकार महर्षी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांची सदिच्छा भेट



सुहासकुमार हणमंतराव देशमुख अमेरिकेतील जगातील नामवंत मायक्रोसॉफ्ट कंपनीच्या सियटल येथील मुख्यालयातील जनरल मॅनेजर म्हणून कार्यरत असलेले बाभळगांवचे सुपुत्र यांनी नुकतीच महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी मा. दिलीपरावजी देशमुख यांची सदिच्छा भेट घेतली. यावेळी लोकनेते विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा सहकारी कारखान्याचे व्हाईस चेअरमन अशोक काळे, उपविभागीय कार्यालय लातूर येथील नायब तहसीलदार सुधीर हणमंतराव देशमुख व सुनिल हणमंतराव देशमुख हे तिन्ही बंधू आदि उपस्थित होते.

## संपादकीय

# मतदार याद्यांतील सुधारणा

बिहारमधील मतदार यादीतील विशेष पुनरिक्षण कार्यक्रम (स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन – एसआयआर) घटनाबाह्य असल्याचा विरोधी पक्षांचा दावा होता. मात्र सर्वोच्च न्यायालयाने गेल्या आठवड्यात तो घटनात्मकदृष्ट्या वैध ठरवून, बिहारमध्ये हा कार्यक्रम सुरू ठेवण्याची मुभा दिली होती. त्यानंतर आता निवडणूक आयोगाकडून देशभरच हा कार्यक्रम राबवला जाणार आहे. त्यासाठी निवडणूक यंत्रणा सक्रिय झाली असून, याबाबत २८ जुलैनंतर अंतिम निर्णय घेण्यात येणार आहे. यावरून पुन्हा रणकंदन होणार हे नक्की. पण हा निर्णय स्वागतार्हच म्हणावा लागेल. निवडणूक आयोग पंतप्रधान नरेंद्र मोदी सरकारच्या हातचे बाहुले बनले आहे, असा आरोप करताना राज्यसभेचे खासदार कपिल सिब्बल यांनी बिहारमधील मतदार यादीतील ‘एसआयआर’ घटनाबाह्य असल्याचा दावाही केला आहे. बहुसंख्याकवादी सरकार सत्तेत राहण्यासाठी चालवलेला हा कार्यक्रम असल्याचा त्यांचा आरोप आहे. नागरिकत्व ठरवण्याचे अधिकार निवडणूक आयोगाला नाहीत, असे मत त्यांनी व्यक्त केले आहे. अनेक विरोधी पक्ष आणि इतर अनेकांनीही सरकारच्या या कृतीविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली होती. ‘एसआयआर’मुळे वैध नागरिक मतदानापासून वंचित राहतील, अशी शक्यता विरोधकांनी व्यक्त केली होती. काही राज्यांच्या मुख्य मतदान अधिकार्यांनी त्यांच्या राज्यात यापूर्वी झालेल्या ‘एसआयआर’नंतरच्या मतदार याद्या जाहीर करण्यास आरंभ केला होता.

दिल्लीमध्ये २००८ साली आणि उत्तराखंडमध्ये २००६ मध्ये शेवटचा ‘एसआयआर’ राबवला होता. या राज्यांमध्ये यापूर्वी झालेल्या ‘एसआयआर’नंतरच्या मतदार याद्यांचा आधार नव्याने ही प्रक्रिया अमलात आणताना घेतला जाणार आहे. मतदार याद्या अद्ययावत करण्याच्या दृष्टीने ही प्रक्रिया योग्यच म्हणावी लागेल. बिहारच्या बाबतीत २००३ च्या मतदार यादीचा आधार घेऊन ही प्रक्रिया राबवली जात आहे. मात्र हा वाद सुरू होण्यास निवडणूक आयोग हाच जबाबदार आहे. कारण बिहारमध्ये २०२५ मध्ये निवडणूक होणार, हे आयोगाला ठाऊक होते. पण निवडणुकांना केवळ चार महिने राहिलेले असताना मतदार याद्यांची वैधता आणि त्यामधील नावांचा खरेखोटेपणा याबाबत अचानक शंका उपस्थित करण्यात येऊ लागल्या. खरे तर हे काम त्यापूर्वीच सुरू व्हायला हवे होते, असा आरोप होतो. त्या संबंधात आयोगाने २४ जूनला आदेश काढले आणि २५ जुलैपर्यंत मतदारांनी आपापल्या नावांचा मतदार याद्यांत अंतर्भाव करणे कसे योग्य आहे हे सिद्ध करून दाखवावे, अशा सूचना दिल्या. म्हणजे आपण कायदेशीर मतदार आहोत, हे मतदारांनी स्वतःच सिद्ध करायचे होते. दर काही वर्षांनी मतदार याद्यांची पुनर्रचना व्हायलाच हवी, यात काही शंका नाही. मुद्दा केवळ निवडणुका तोंडावर असताना ही प्रक्रिया सुरू करण्याचा होता. शिवाय बिहारमधील मजूर मोठ्या प्रमाणात स्थलांतर करत असतात. तेव्हा त्यांना केवळ वैधता सिद्ध करण्यासाठी अन्य राज्यांतून बिहारला यायला लावणे हे अडचणीचेच ठरले आहे. शिवाय आधार कार्ड आणि रेशन कार्ड या दोन्हींपैकी एकही पुरावा निवासी दाखला म्हणून ग्राह्य धरला जाणार नाही, असे आयोगाने म्हटले आहे.

वास्तविक निवासाबाबत खात्री केल्याखेरीज आधार कार्ड दिले जात नाही आणि सर्व तपासण्या केल्यानंतरच रेशन कार्ड दिले जाते. या निर्णयाने बिहारमधील तीन कोटी लोकांना आपण अधिकृत मतदार असल्याचे केवळ महिनाभरात सिद्ध करावे लागणार आहे. बिहारमधील ६० टक्के मतदारांची पडताळणी अगोदरच पूर्ण झाली आहे. कोणाचीही नावे त्यांचे म्हणणे ऐकून न घेता काढली जाणार नाहीत, असे आश्वासन निवडणूक आयोगाच्या वकिलांनी सर्वोच्च न्यायालयात दिले आहे. पण आयोगाने आकस्मिकपणे ही प्रक्रिया सुरू केल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने प्रश्न उपस्थित केले आहेत. तरीही बिहारमध्ये ‘एसआयआर’ प्रक्रिया सुरू ठेवण्यास मान्यता दिली होती, हे महत्त्वाचे.

मुळात बिहारमध्ये नेपाळ, बांगला देश व म्यानमारमधील घुसखोरांची संख्या मोठी आहे. हेच चित्र आसाम व पश्चिम बंगालमध्येही आहे. आता मतदार यादी सुधारण्याचा कार्यक्रम राष्ट्रीय स्तरावर हाती घेण्यात आल्यास बोगस मतदारांची नावे वगळली जाऊन याद्यांची साफसफाई होईल. लोकशाहीची बूज राखण्यासाठी हे काम नेटाने व प्रामाणिकपणे पूर्ण केलेच पाहिजे. कोणत्याही निवडणुकीत पराभव झाल्यास ईव्हीएमला दोष दिला जातो. महाराष्ट्राच्या २०२४च्या विधानसभा निवडणुकीत भाजपप्रणीत महायुतीचा अभूतपूर्व विजय झाला, तेव्हा त्या निवडणुकीतही हेराफेरी आणि मॅचफिक्सिंग झाल्याचा आरोप झाला. लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी तसा आरोप केला होता. या आक्षेपांना निवडणूक आयोगाने उत्तरही दिले होते. मात्र तेलंगणा, कर्नाटक अथवा हिमाचल प्रदेशात काँग्रेसचा विजय झाला, तेव्हा त्या निकालांबद्दल राजकीय पक्षांकडून जराही शंका व्यक्त झाली नव्हती. २०२० साली बिहार विधानसभेच्या निवडणुका झाल्या, तेव्हाही नीतिश कुमार यांचा जेडीयू आणि भाजपच्या आघाडीचा विजय झाला. त्यावेळीही निवडणुकीत गैरप्रकार झाले आणि आयोगाने त्याच्याकडे दुर्लक्ष केले, असा आरोप राष्ट्रीय जनता दलाचे अध्यक्ष लालूप्रसाद यादव आणि तेजस्वी यादव यांनी केला होता.


# नीतिमान समाज व्यवस्थेसाठी बुद्धांची शिकवण आवश्यक....

श्रश्र उच्छिन्द सिनेहमत्तनो, कुमुदं सारदिकं’व पाणिना । सन्तिमग्गमेव ब्रूहय, निब्बानं सुगतेन देसितं ।।
अर्थ: शरदऋतूतील कमळ जसे हाताने तोडले जाते, तसे स्वमग्नता तोडून टाकावी आणि सुगत द्वारा उपदिष्ट शांतीमार्ग–निर्वाणाचे अनुसरण करावे.

स्व म्हणजेच स्वतः किंवा स्वभाव, हा शब्द विविध संदर्भात वापरला जातो. एखाद्या व्यक्तीचा मूलगामी स्वभाव, अंतर्गत वृत्ती, विचारांची पद्धत. यासाठीही स्व हा शब्द वापरला जातो.

स्वमग्नता म्हणजे एखादी व्यक्ती सतत स्वतःच्याच विचारात, भावना, दु:ख, स्वप्न, किंवा समस्यांमध्ये इतकी गुंतून जाते की, ती बाहेरील जगाशी, लोकांशी संवाद साधण्यास किंवा समजून घेण्यास अक्षम होते. त्यामुळे फक्त स्वतःच्या गरजा, भावना आणि अपेक्षा यांचाच विचार केल्याने इतरांचे अस्तित्व दुर्लक्षित होऊ शकते.

व्यक्ती मी, माझे करत स्वतःमध्ये गुंतून जात असते. स्व मध्ये गुंतून राहणे म्हणजे फक्त स्वतःच्या अनुभव, भावना, अहंकार, किंवा स्वरूपातच रमणे होय.हे एक प्रकारचे स्व बंधन (शिश्रष–लेपवरसश) ठरते. हे बंधन मोडून मुक्ती ( निर्वाण, शांती) प्राप्त करण्यासाठी काही महत्त्वाचे मार्ग आहेत.मी, माझं, माझ्यासाठी या अहंकारात अडकलेली वृत्ती म्हणजे स्व. फक्त स्वतःच्या सुखदु:खात अडकणे यामुळे स्वतःचे गैरसमज, अहंकार वाढतात. यामुळे माणूस वास्तव, समाज आणि सर्वत्र असलेल्या नैसर्गिक चैतन्याशी तुटतो.स्व मधून बाहेर पडून पर मध्ये रमणे म्हणजेच स्वविकास साधने. ध्यानाने आपण ’स्व’पासून ’अस्व’कडे, म्हणजे व्यापक चैतन्याकडे जातो. यासाठी सुगत म्हणजेच तथागत गौतम बुद्ध आणि त्यांचा धम्ममार्ग समजून घेणे उचित ठरते. सुगत हे गौतम बुद्धांचे एक अतिशय सन्माननीय आणि अर्थपूर्ण विशेषण आहे.जो उत्तम मार्गाने गेला आहे किंवा जो चांगल्या मार्गाने गेला व तिथे मंगलदायी विशेष असे निर्माण केले , त्यास सुगत म्हटले जाते. बुद्धांनी मध्यम मार्ग (चळववश्रश झरींह) स्वीकारला की तो न अति–संयमाचा होता, न अति–भोगाचा. त्यांचा मार्ग संयम, करुणा, प्रज्ञा, आणि शांतीचा होता. बुद्धांनी दुःखांचा अंत केला आणि निर्वाण प्राप्त केले. ते स्वतः मुक्त झाले आणि इतरांना मुक्तीचा मार्ग दिला. सत्य आणि करुणेच्या मार्गाने गेलेला म्हणजे ही सुगत होय. त्यांनी खोटेपणा, अंधश्रद्धा, हिंसा, व अन्यायापासून दूर राहून सत्य, करुणा व अहिंसेचा मार्ग सांगितला. बुद्धांचे बोलणे नेहमी सम्यक ,सत्य, प्रिय, हितकर, कालसंगत आणि मधुर होते . म्हणून त्यांना सुगतवाणीचे धारक असेही म्हटले जाते. इति पि सो भगवा अरहं सम्मासम्बुद्धो... सुगतो लोकविदु... असे बुद्धाच्या गुणांचे वर्णन केलेले आहे.सुगत म्हणजेच बुद्धांचा धम्ममार्ग, निर्वाण, आणि करुणेच्या पथाचे गौरवचिन्ह आहे. जो स्वतः ही मुक्त झाला आणि इतरांनाही मुक्तीचा मार्ग दिला तोच सुगत. म्हणजेच तथागत गौतम बुद्ध होत.



गौतम बुद्धांची शिकवण कालातीत आहे . ती फक्त प्राचीन भारतापुरती मर्यादित नाही, तर आजच्या ताणतणावपूर्ण, विषमतेने भरलेल्या आणि नैतिकतेपासून दूर गेलेल्या समाजासाठी अत्यंत उपयुक्त आणि आवश्यक आहे. बुद्धांचा धम्म म्हणजे मानवतेचा प्रकाशमार्ग आहे. भगवान गौतम बुद्ध हे मानवतेचे महान शिक्षक होते. त्यांनी केवळ धम्म नव्हे, तर जगण्याची कला शिकवली. त्यांचे विचार, उपदेश आणि जीवनदृष्टी आजही तितकीच समकालीन, वैज्ञानिक आणि मानवतावादी आहे. बुद्धांनी जे शिकवले ते केवळ ग्रंथापुरते मर्यादित नाही, तर संपूर्ण मानवजातीसाठी आवश्यक मार्गदर्शन आहे. सत्य, संयम, करुणा, प्रामाणिकपणा यांना बुद्धांनी खूप महत्त्व दिले. त्यांची अत्त दीप भव ही शिकवण संशोधन, विवेक, आणि वैज्ञानिक विचारासाठी उपयुक्त आहे. बुद्धांनी सांगितलेले ,निर्वाण म्हणजे असा मानव निर्माण करणे की,जो स्वतःच्या बुद्धीचा उपयोग करून सत्य शोधतो, स्वतःसाठी नव्हे तर जगासाठी जगतो. बुद्धत्व ही प्रत्येकात सुप्त असलेली शक्यता आहे. . ती जागवणे म्हणजेच ’बुद्धांना अपेक्षित खरे निर्वाण होय’. शिक्षण, विवेक, नैतिकता, विज्ञानाधारित विचार, योग्य सानिध्य व मार्गदर्शन मिळवणे, तसेच ध्यान आणि स्मृतीपूर्वक स्वतः कडे पाहणे, अंतरंग विकसित करणे, समता आणि सेवाभाव वृत्तीने समाजासाठी कार्य करणे, आचरण उचित राखणे हे त्यामध्ये अपेक्षित आहे. गौतम बुद्धांनी दिलेली शिकवण ही समाज घडवणारी, नैतिकता वाढवणारी आणि समतेवर आधारित व्यवस्था निर्माण करणारी आहे.नीतीमूल्यांचा पाया म्हणजेच करुणा आणि अहिंसा.बुद्ध म्हणतात: द्वेष द्वेषाने संपात नाही, तर तो मैत्रीने संपतो.समाजात जर ही वृत्ती रुजली तर संघर्ष, युद्ध, हिंसा यांना थारा उरणार नाही. त्यांनी विवेक, प्रश्न विचारण्याची मुभा, आणि स्वतंत्र विचार यांना महत्त्व दिले.त्यामुळे समाजात बुद्धिप्रामाण्य आणि न्यायाधारित निर्णय घेण्याची परंपरा निर्माण झाली.बुद्धांचे विचार म्हणजे नीतिमूल्यांचा झरा आहे. ती शिकवण जर समाजात रुजली, तर समाज हा केवळ कायद्याने नव्हे, तर अंतःकरणाने नीतीमूल्ये पाळणारा बनेल. म्हणून नीतिमान समाजव्यवस्था घडवण्यासाठी बुद्धांची शिकवण अत्यावश्यक आहे.

*******

किशोर कासारे
मंडणगड (दाभट)
८७६७४२५१८०

# हा माझा अंत नाही ...!

माणसाच्या जीवनात सुखदु:ख, यश–अपयश, प्रेम–विरह, अश्रू–हास्य या सगळ्या भावना येत असतात. हेच जीवनाचे खरे रूप आहे. कधी आपण आकाशात उंच झेप घेतो, आणि कधी जमिनीवर आपटून पडतो. हे सगळं चालूच असतं. पण खरा प्रश्न असतो, आपण या सगळ्या अनुभवांनंतर उभं राहतो का? की जमिनीवरच पडून राहतो? आपण सगळेच आयुष्यात कधी ना कधी थकतो. कठोर परिश्रम करूनही जर यश मिळालं नाही, तर मनात निराशा दाटते. एकेक करून माणसं साथ सोडतात, अपयश पचवत नाही, आणि आपण खचून जातो. अशा वेळी मनाच्या एका कोपऱ्यात वाटतं आता बस झालं, पुन्हा नको काहीच. सगळं सोडून द्यावं. पण अशी वेळ आली, तरी आपल्याला स्वतःला सांगावं लागतं थांबू नकोस, कारण अजून खूप काही करायचं आहे. खरं तर प्रत्येक माणसाच्या आयुष्यात संकटं येतात. ती कोणालाही चुकलेली नाहीत. पण काही लोक संकटांसमोर हात टेकतात, तर काही जिद्दीने उभं राहतात. नशीब चांगलं म्हणून कोणी यशस्वी होत नाही, तर त्यामागे असतो त्याचा संघर्ष, त्याचा आत्मविश्वास. आणि म्हणूनच, अपयश आल्यावरही पुन्हा चालणं महत्त्वाचं. माणसाने आयुष्याकडे सकारात्मक दृष्टीने बघायला हवं. एक वेळ अशीही येते, की मनात आशेचा एक किरणही उरत नाही. दिवसभर काम करूनही जेव्हा पोट भरत नाही, तेव्हा आत्मा आतून रडतो. अशावेळी डोळ्यातून अश्रू येतात, मन गहिवरून जातं. पण त्या अश्रूंमध्येच एक ताकद असते. जेव्हा आपण त्या अश्रूंना कमजोरी न मानता, ऊर्जा मानतो, तेव्हा त्या अश्रूंच्या मागे एक निर्धार जन्म घेतो. अपयश म्हणजे सगळंच संपलं असं नाही. अपयश म्हणजे फक्त एक थांबा. आपल्याला पुन्हा मार्ग ठरवायचा, चुका शोधायच्या आणि पुढच्या वेळेस त्या चुकांपासून शिकायचं. अपयशामुळे कोसळायचं नाही, तर उठून बळकट व्हायचं. आपण चुकलो म्हणजे आपण संपलो असं नाही. माणूस चुकतोच. पण तो जर मनाने उभा राहिला, तर तोच मोठा विजेता ठरतो. समाज बर्याचदा आपल्या चुका, अपयश, कमतरता यांच्याकडे बोट दाखवतो. यशस्वी झाल्यावर लोक आपल्या पाठीवर थाप मारायला तयार असतात, पण यशाच्या शिखरावर पोहोचेपर्यंत कोणीही हात द्यायला तयार नसतं. आज आपण गारद झालो तर लोक हसतात, टीका करतात. काय होणार त्याचं?, स्वप्नं पाहून काही होत नाही, आपलं काम सोडून हे काय करत बसलाय? अशा अपमानजनक टीका करतात. पण हेच लोक, उद्या आपल्या यशाच्या झगमगाटात तोंड लपवतात. जे आज आपल्याला ओळख देत नाहीत, तेच उद्या फोटोसाठी रांगेत उभे राहतात. आपल्याला त्या लोकांवर रागावण्याची गरज नाही. त्यांना दुर्लक्ष करत, आपण आपली वाट चालत राहिली पाहिजे. आपण आपल्या अंतःकरणाचं ऐकायचं. कारण आपलं स्वप्न फक्त आपल्याला दिसतं. आपलं जीवन आपल्यालाच जगायचं आहे. लोक येतील, जातील. पण आपलं ध्येय ठाम असायला हवं. यश मिळाल्यावर सगळे आपले होतात. पण अपयशाच्या काळात जो स्वतःसाठी उभा राहतो, तो खरा योद्धा असतो. कधी कधी माणूस इतका एकटा होतो की त्याला वाटतं आता कोण माझ्यासोबत आहे? सगळे जवळचे निघून जातात. विश्वासघात होतात. जो खांदा आधार द्यायचा, तोच नजरेआड होतो. अशावेळी मन अधिकच निराश होतं. पण खरं पाहिलं तर, एकटेपण म्हणजे शिक्षा नाही, ती एक संधी आहे. या संधीचा उपयोग आपण स्वतःची ओळख पटवण्यासाठी करू शकतो. जेव्हा माणूस एकटा राहतो, तेव्हा त्याचं मन त्याच्याशी संवाद साधतं. जीवनाचा खरा अर्थ कळायला लागतो. आपल्यातली शक्ती ओळखायला लागते. अशावेळी जो स्वतःला उभं करू शकतो, तोच यशस्वी होतो. एकटं चालायला शिकल्याशिवाय, मोठं होता येत नाही. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांनी लहानपणी पेपर विकले. गरिबी, शिक्षणासाठी संघर्ष, अपयश सगळं झेललं. पण त्यांचं स्वप्न होतं वैज्ञानिक बनायचं. आणि तेच ते बनले. पुढे भारताचे राष्ट्रपती झाले. त्यांनी कधीच हार मानली नाही. कारण त्यांचा आत्मविश्वास त्यांच्यासोबत होता. आत्मविश्वास हेच माणसाचं खरं बळ आहे. आत्मविश्वास म्हणजे काय? तर मी करू शकतो हा विचार. जगात सगळं मिळू शकतं, पण आत्मविश्वास हरवला की माणूस कोसळतो. कोणतंही काम करायचं असेल, तर ते आत्मविश्वासाने करावं लागतं. सुरुवात छोट्या पावलांनी केली तरी चालेल, पण मनात विश्वास पाहिजे की आपण पोहोचू शकतो. स्वतःवर विश्वास ठेवा. सुरुवात केल्यावर अडचणी येणारच. पाऊल टाकल्यावर काटे टोचणारच. पण जर मनात ठरवलं मी थांबणार नाही, मी हरलेलो नाही तर आकाशही लांब नाही. या जगात लाखो माणसं रोज संघर्ष करतात. पण जे ठाम राहतात. तेच पुढे जाऊन मोठं काहीतरी करतात. साधी उदाहरणं आपल्या आजूबाजूला आहेत. आपल्या गावातली भाग्यश्री मावशी नवऱ्याच्या मृत्यूनंतर दोन लहान मुलं. कोणतीही कमाई नाही. सासरच्या लोकांनी हाकलून दिलं. पण मावशीने हार मानली नाही. सकाळी भाजी विकली, दुपारी लोकांकडे भांडी घासली, रात्री शिवणकाम केलं. आज ती दोघं मुलं शिकवून मोठं केलं आहे. एक मुलगा इंजिनिअर, एक पोलीस. मावशी म्हणते माझं काही राहिलं नव्हतं, पण मी थांबले नाही. हेच खरं जगणं आहे. आयुष्यात कधी कधी अपयश आले की आपल्याला वाटतं आता काही राहिलं नाही. पण खरं सांगायचं, तर अजून खूप काही बाकी असतं. आपल्याला अजून खूप शिकायचं असतं, खूप निर्माण करायचं असतं, खूप स्वप्नं पूर्ण करायची असतात. एक यश नाकारलं म्हणून संपूर्ण जीवन फसलेलं नसतं. माणूस तेव्हाच हरतो, जेव्हा तो स्वतःच्या मनात हरतो. त्यामुळे संकटं कितीही मोठी असली, तरी मन मोठं असायला हवं. आयुष्याशी मैत्री करा. संघर्षांशी मैत्री करा. यशच हवं, असं नाही. अनुभवही तेवढाच मौल्यवान असतो. जो अनुभवातून शिकतो, तोच यशाकडे पोहोचतो. आपण रोज सकाळी उठतो, ते नवीन संधीसाठी. प्रत्येक दिवस नवी सुरुवात असतो. मग आपण का म्हणायचं की संपलं, बस झालं? नाही. अजून खूप चालायचं आहे. अजून खूप झगडायचं आहे. अजून खूप स्वप्नं पुरी करायची आहेत. जोपर्यंत श्वास आहे, तोपर्यंत हार मानायची नाही. अनेक लोकांनी आयुष्यात कठीण प्रसंग झेलले आहेत, पण त्यांनी लढून यश मिळवलं आहे. त्यांनी अपमान गिळले, लोकांच्या नावड्या सहन केल्या, पण मनातली ज्योत विझू दिली नाही. त्यामुळे आपणही ठरवूया संकटं आली, तरी मी थांबणार नाही. अपयश आलं, तरी मी पुन्हा प्रयत्न करणार. लोक हसले, तरी मी स्वप्नं पाहणार. कारण मी ठरवलं आहे हा माझा अंत नाही! म्हणून आपण किती वेळा पडलो, याची मोजणी नको. आपण किती वेळा उभं राहिलो, हे महत्त्वाचं. आपण थकलो, रडलो, एकटे पडलो, पण चालणं थांबवलं नाही हाच खरा विजय. प्रत्येक अंधाराच्या शेवटी प्रकाश असतो, प्रत्येक संघर्षाच्या पाठी यश असतं. म्हणूनच, स्वतःला रोज सांगायचं मी थांबणार नाही. कारण माझं स्वप्नं अजून जिवंत आहे. माझा आत्मविश्वास अजून जागा आहे. आणि हेच कारण पुरेसं आहे की हा माझा अंत नाही... ही माझी नवी सुरुवात आहे.

*********

प्राचार्य डॉ. बालाजी लाहोरकर
श्रीमती सिंधुताई जाधव महाविद्यालय मेहकर जिल्हा बुलढाणा
मोबाईल – ९८८१३६१४६९


# न्यायिक पदासाठी योग्य उमेदवार

योग्य निवड प्रक्रियेतून ‘न्यायिक अधिकारी प्रशिक्षणार्थी’ तीन वर्षे गेल्यास नक्कीच सर्वोच्च न्यायालयाला अपेक्षित असे योग्यतेचे न्यायाधीश न्यायपालिकेत येतील.

२० मे २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश बी. आर. गवई, न्या. ए. जी. मसिह व न्या. विनोद चंद्रन यांच्या खंडपीठाने ‘ऑल इंडिया जजेस असोसिएशन’ विरुद्ध ‘युनियन ऑफ इंडिया’ या खटल्याच्या चार याचिकेत एकत्रितपणे निर्णय देताना न्यायिक अधिकारी होण्यासाठी वकिलीची पदवी घेतल्यानंतर किमान तीन वर्षे प्रत्यक्ष वकिलीचा अनुभव असणे सक्तीचे करण्याचा आदेश दिला. तीन महिन्यांत सर्व उच्च न्यायालय व सरकारने याची अंमलबजावणी करावी, असा आदेश दिला आहे. वकिलीच्या अनुभवाशिवाय थेट न्यायाधीशपदी निवड झाल्यामुळे आतापर्यंत न्यायप्रक्रियेत आलेले अनुभव चांगले नसल्याचे न्यायालयाने नमूद केले आहे व पदभार स्वीकारल्याच्या दिवसापासून त्यांच्या स्वभावाच्या व वर्तणुकीच्या समस्या निर्माण झालेल्या दिसत आहेत, अशी टिप्पणीदेखील खंडपीठाने केली आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाने योग्य व अनुभवी न्यायिक अधिकारी नक्की निर्माण होतील जे सुदृढ लोकशाहीसाठी अत्यंत गरजेचे आहे. मात्र, तरुण मुलांना व विशेषतः मुलींना त्यांचे करिअर सुरू करण्यासाठी १२वीनंतर पाच वर्षे पदवीपर्यंत व तीन वर्षे वकिली व त्यानंतर एक ते दोन वर्षे निवड प्रक्रिया यामुळे साधारण २८ वय वर्षे न्यायिक अधिकारी म्हणून करिअर सुरू करण्यास लागणार आहेत. त्यातून देखील ते कितपत या परीक्षेत यशस्वी होतील त्याबाबत साशंकता आहे. त्यामुळे या विद्यार्थ्यांना वैद्यकीय अथवा इंजिनिअरिंग केलेल्या विद्यार्थ्यांप्रमाणे विधीच्या पदवीधरांना मानधनासारखे पर्याय उपलब्ध होणे गरजेचे आहे. आयुष्याचा एकतृतीयांश वेळ शिक्षणात गेल्याने आर्थिकदृष्ट्या गरीब असलेल्या मुलांचा विचार होणे गरजेचे आहे. तर खर्या अर्थाने न्यायिक अधिकारी होण्यासाठीच्या तीन वर्षे वकिलीच्या अटीला अर्थ प्राप्त होणार आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून नवोदित वकिलांना बार काउन्सिलद्वारे मानधनाचा प्रश्न प्रलंबित आहे. विधी सेवा समितीद्वारे गरजू पक्षकारांना मोफत न्याय मिळावा म्हणून जनजागृतीवर मोठ्या प्रमाणात खर्च केला जातो. या खर्चातून बराचसा खर्च प्रशिक्षणार्थी/नवोदित वकिलांना भत्त्यासाठी वापरता येईल. किमान हे मानधन जे न्यायिक अधिकारी होणार आहेत



त्यांना देता येईल. १९ डिसेंबर २०२४ रोजी राज्यसभेत एका अतारांकित प्रश्नावर उत्तर देताना सांगितले गेले की न्यायिक अधिकारी यांच्या ५ हजार २६२ जागा रिक्त आहेत. इतक्या जागा रिक्त असताना दरवर्षी १० टक्के जागा वाढवण्याचा प्रयत्न करण्याची योजना असल्याचे सांगण्यात आले. या सर्व जागा भरण्याच्या दबावामुळे काहीवेळा बरेचदा अयोग्य उमेदवार भरले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणजेच सर्व राज्यांना सरासरी ५ हजार न्यायिक अधिकारी वर्गाच्या जागा भराव्या लागणार आहेत.

बार काउन्सिलद्वारे साधारण एक लाख रुपये दरवर्षी नवोदित वकिलांना देणे अशक्य आहे. तर ज्या पाच हजार जागा दरवर्षी भरल्या जाणार आहेत त्यापैकी सरासरी २०% म्हणजेच १००० जागापुरते मर्यादित ठेवता येईल, जेणेकरून सरकार अतिरिक्त निधी वाटप मंजूर करेपर्यंत विधी सेवा समिती विद्यमान अनुदानातून खर्च भागवू शकेल. सदर प्रशिक्षणार्थी वकिलांना तीन वर्षे विधी सेवा समितीने दिलेल्या वेळेत काम करावे लागेल. संपूर्ण भारतातून तीन हजार वकिलांना या विधी सेवा समितीत प्रशिक्षणार्थी म्हणून निवडता येईल. मानधन हे साधारणत: १५ हजार रुपये प्रति प्रशिक्षणार्थी हे लहान गावातून व २० हजार रुपये महानगरपालिका क्षेत्रातून देता येऊ शकते.

न्यायिक अधिकारी होण्यासाठी प्रशिक्षणार्थींना तीन वर्षे सेवा करावी लागणार असल्याने सुरुवातीला एक वर्षासाठी त्यांची नियुक्ती केली पाहिजे व त्यांची अपात्रता सिद्ध करणारे वगळता सर्वासाठी तीन वर्षापर्यंत मुदतवाढ दिली पाहिजे व त्यानंतर जास्तीत जास्त तीन महिने महिलांना मुदतवाढ देता येईल. त्यामुळे पुन्हा इतर नवोदितांना संधी देता येईल. जर २० हजार रुपये प्रति प्रशिक्षणार्थी नुसार तीन हजार प्रशिक्षणार्थी यांना ६ कोटी रुपये व वार्षिक ७२ कोटी रुपये इतका खर्च या प्रशिक्षणार्थींवर होणार आहे.

राष्ट्रीय विधी सेवा समितीच्या वेबसाइट वरील आकडेवारीनुसार २०१७/१८ साली ३४ कोटी ९१ लाख ४८ हजार ११० रुपयांचा निधी अवितरित राहिला. सदरचा असा निधी या प्रशिक्षणार्थी मानधनासाठी वापरला जाऊ शकतो. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश यांनी एका याचिकेवर या मानधनासाठी निधी उपलब्ध कोठून करायचा याबाबत प्रश्न विचारला होता. त्यासाठी हा पर्याय आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या खंडपीठाने केलेल्या नवोदित न्यायाधीश यांच्या स्वभावाच्या व वर्तणुकीच्या प्रश्नावर पर्याय पाहताना राष्ट्रीय विधी सेवा समिती असे प्रशिक्षणार्थी निवड करताना राष्ट्रीय न्यायिक ॲकॅडमीद्वारे केलेल्या बुद्धिमत्ता मूल्यांक, मानसिक आरोग्य, भावनात्मक आरोग्य इत्यादी चाचण्या पाहून निर्णय घेऊ शकते. सदर प्रशिक्षण केंद्राद्वारे स्वभावाशी व वर्तणुकीशी संबंधित सर्व बाबींची चाचणी त्या त्या क्षेत्रातील तज्ज्ञांद्वारे करण्यात याव्यात. सदर चाचण्या न्यायिक अधिकारी चाचण्या म्हणून घोषित करण्यात याव्यात. पाच वर्षांच्या कोर्सनंतर जवळच्या सत्र परीक्षेत किमान ६६ टक्के गुण सदर प्रशिक्षणार्थींनी मिळवले असावेत व तेही पहिल्या प्रयत्नात अशी अट असावी.

या तीन वर्षांत न्यायाधीश व विविध वकील यांच्यासोबत काम केल्याने तसेच वकील संघटनेबरोबर काम केल्याने सदर प्रशिक्षणार्थींचे मूल्यमापन करणे शक्य होणार आहे. सदर प्राशिक्षणार्थींच्या कामगिरीबाबत अहवाल विधी सेवा समितीकडे व वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवता येईल. वकील संघटनेच्या पत्रापेक्षा अशा पद्धतीने मूल्यांकन केले तर ते जास्त फायदेशीर ठरणार आहे.

# प्रशिक्षणार्थींना कायमस्वरूपी रोजगार मिळवून देणारच– बालाजी पाटील चाकूरकर यांची मुंबईच्या आझाद मैदानावर गर्जना

लातूर -- मुंबई येथील आझाद मैदानावर २५ ते ३० हजार मुख्यमंत्री युवा कार्यप्रशिक्षणार्थींचा विराट धडक मोर्चा लोकनेते बालाजी पाटील चाकूरकर यांच्या नेतृत्वाखाली आझाद मैदानावर धडकला या आझाद मैदानावर झालेल्या सभेत राज्य सरकारवर टीकास्त्र सोडत अकरा महिने प्रशिक्षण केलेल्या प्रशिक्षणार्थींना दिलेले राज्य सरकारचे प्रमाणपत्र हे कोठे उपयोगात येणार आहे याचा सवाल विचारत एक लाख ३४ हजार प्रशिक्षणार्थ्यांना विविध आस्थापनेमध्ये दिलेले प्रशिक्षण आणि प्रशिक्षण युक्त प्रशिक्षणार्थ्यांना राज्य सरकारला कायमस्वरूपी रोजगार द्यावाच लागेल आणि त्यांच्या मानधनात वाढ करावीच लागेल जर करता सरकार प्रशिक्षणार्थ्यांना असेच जर वाऱ्यावर सोडणार असेल तर पुन्हा बेरोजगारीची कुऱ्हाड प्रशिक्षणार्थ्यांच्या पायावर कोसळणार आहे. पुन्हा दहा लाख लोकांच्या भाकरीचा प्रश्न निर्माण होणार असल्याचे सांगत बालाजी पाटील चाकूरकरांनी मुंबईच्या आझाद मैदानावर सरकारला धारेवर धरले.



विधानसभा निवडणुकीच्या अगोदर राज्य सरकारने लाडक्या बहिणी सोबत लाडक्या भावाला वाऱ्यावर सोडणार नसल्याचे सांगत मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या माध्यमातून दहा लाख युवकांना रोजगार देण्याचे घोषित केले होते आणि त्याकरिता साडेपाच हजार कोटी रुपयांचे बजेट प्रावधान पण केले होते पण केवळ एक लाख ३४ हजार प्रशिक्षणार्थ्यांनीच यामध्ये सहभाग नोंदवला सहा महिन्याचे प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर बालाजी पाटील चाकूरकर यांच्या नेतृत्वाखाली अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या काळात २४ दिवस बेमुदत आमरण उपोषण करण्यात आले होते. याची दखल घेऊन प्रशिक्षणाचा कालावधी पाच महिन्यांनी वाढवला होता पण आमची मागणी ही पाच महिने वी प्रशिक्षण वाढ न करता आम्हाला ११ महिन्याचा कायमस्वरूपी रोजगार सरकारने दिलाच पाहिजे नाहीतर हे बेरोजगार झालेले युवक व्यसनाधीन होतील मारामाऱ्या करतील, दहशतवादी कारवाया करणाऱ्यांच्या हाताला लागतील, नाहीतर राजकीय पुढाऱ्याचे हस्तक बनून आयुष्य बरबाद करतील नाहीतर आत्महत्या करतील अशा प्रकारची भीती बालाजी पाटील चाकूरकर यांनी आपल्या भाषणातून व्यक्त केली. आज हे प्रशिक्षणार्थी आठ दहा आणि सहा हजारामध्ये एक लाख रुपये पगार घेणाऱ्या कर्मचाऱ्यापेक्षा जास्त चांगलं काम यांनी या प्रशिक्षणाच्या कालावधीमध्ये करून दाखवले अनेक शाळांची गुणवत्ता वाढल्याचे चित्र या प्रशिक्षणार्थींच्या कालावधीमध्ये दिसून आलेला आहे. याचाही उहापोह बालाजी पाटील चाकूरकरांनी आपल्या भाषणात केला. आज असंख्य तरुणांचे विवाह थांबलेले आहेत आज त्यांचे वय ३५ च्या पुढे जात आहे आज तारुण्यात सरकारने या युवकांना वृद्धापकाळ भोगण्यास भाग पाडले आहे सरकारच्या चुकीच्या धोरणामुळे राज्यातली बेरोजगारी गगनाला भेटते पाच पाच पदव्या डोक्यावर घेऊन फिरणारे तरुण हातात आणि उदास होऊन राज्यभर फिरत असल्याचा चित्र हे राज्याच्या प्रगतीसाठी निश्चितच मारक ठरणार असल्याचे बालाजी पाटील चाकूरकर यांनी सांगितलं. कर्नाटक आणि दिल्ली सरकारने बेरोजगारांना रोजगार कसा उपलब्ध करून दिला याबाबतचे विविध उदाहरण देत राज्य सरकारला या शेजारी राज्याचा आदर्श घेण्याचा सल्ला सुद्धा बालाजी पाटील चाकूरकर यांनी दिला. आझाद मैदानावरील आक्रोश आणि विराट धडक मोर्चाची दखल घेत राज्य सरकारने मुख्यमंत्री कार्यालयाच्या मार्फत कॅबिनेट मंत्री नामदार गिरीश महाजन यांच्यामार्फत विधान भवन येथे आंदोलनकर्त्यांच्या शिष्टमंडळाची भेट घेऊन आंदोलनकर्त्यांची बाजू समजावून घेतली आणि मी मुख्यमंत्री अशी बोलेन आणि त्यांना नक्कीच या विषयांमध्ये मार्ग काढण्याचा प्रयत्न करेन तुम्ही निश्चिंत रहा अशा प्रकारचा शब्द दिला.या शिष्टमंडळामध्ये लोकनेते बालाजी पाटील चाकूरकर, माजी खासदार हरिभाऊ राठोड, अनुप चव्हाण, तुकाराम बाबा, प्रकाश साबळे, रोशनी पवार, महेंद्र पाटील सरिता लिंगायत, भारती जाधव आदी जणांचा समावेश विधानभवनातील शिष्टमंडळामध्ये होता. हा महाराष्ट्रव्यापी विरारट धडक छत्री मोर्चा यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यामधील सर्व जिल्हाध्यक्ष तालुकाध्यक्ष आणि विशेषतः लातूरचे जिल्हाध्यक्ष अनिकेत मांदळे, गोविंद टोम्पे, शुभम पांचाळ, सुजित कुमार शिंदे, गंगाधर कुमठेकर, अविनाश जाधव, शिवशंकर पाटील, जालन्याचे विकी पाखरे, गोपाल जाधव, अमरावतीचे आकाश गडपाल, अक्षय सरोदे, मुंबईच्या काजल बुट्टे, कल्याणचे निखिल म्हात्रे, तायडे, सोलापूरचे सोमनाथ विभूते, नांदेडचे गोपाळ आरसुळे, संभाजीनगर च्या वर्षा लाहाने, परभणीचे पांडुरंग मोर ताटे, चंद्रपूरचे लक्ष्मण दानव, वाशिमचे सुरज अवतार, गुरुजन चे महेश देवळे, यवतमाळचे सुनील गोळेकर, बीडचे सोपान संत, अलीम सय्यद, धाराशिव चे रेश्मा कोळी, धनाजी हुकमाते, नितीन उंबरे, पालघरच्या विद्याताई पडळकर, नंदुरबारच्या हर्षदा खैरनार, नाशिकचे भूषण वानखेडे, वर्धेचे धर्मेंद्र तीमासे, निलेश महाजन, अकोल्याचे अहमद सय्यद, पवन भट, हिंगोली चे अजय मंडले, ठाण्याचे धीरज गुरमे, अहिल्यानगरचे प्रमोद मिसाळ, सांगलीचे तनवीर पिंजारी, साताऱ्याचे आशिष पुजारी, प्रवीण माने, धुळ्याचे निलेश कुवे पाटील, बुलढाण्याचे अमित मानवतकर, सतीश काकडे, गडचिरोलीचे पंकज नेताम, निलेश नाकाडे आधी ३६ जिल्ह्यातील जिल्हाध्यक्ष व तालुकाध्यक्ष तसेच अनेक प्रशिक्षणार्थींनी हे आंदोलन यशस्वी करण्यासाठी जीवाचे रान केले. आणि हा मोर्चा यशस्वी केला. या मोर्चाला पाठिंबा देण्यासाठी अनेक आमदार अनेक पक्षाचे प्रमुख आदींनी भेटी दिल्या आणि पाठिंबा दिला या मोर्चाच्या दिवशी विधानसभेमध्ये आमदार अमित देशमुख,आमदार अमित झनक, आमदार बाबाजी काळे, आमदार रोहित पवार आधी आमदार महोदय यांनी विधानसभेमध्ये आवाज उठवून या प्रशिक्षणार्थींना कायमस्वरूपी रोजगार मिळवून देण्याकरिता शासनाचे लक्ष वेधले.अधिवेशनाची सुरुवात राष्ट्रगीताने झाली. आझाद मैदानावर पोलीस विभागाने चौक बंदोबस्त ठेवला होता

# केज न.पं.वतीने आरोग्य,जनहित व पर्यावरण सेवा सप्ताहाचे आयोजन

केज/प्रतिनिधी आजपासून केज न.पं.वतीने आरोग्य,जनहित व पर्यावरण सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे तरी केज शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार यांच्या पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांनी केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार व माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त केज नगरपंचायत च्या वतीने आरोग्य, जनहित व पर्यावरण सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त या सेवा सप्ताह कार्यक्रमाचे आयोजन हे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे ज्येष्ठ नेते हारणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ. सीता ताई बनसोड यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले आहे. सेवा सत्यातील कार्यक्रम दिनांक १५ जुलै २०२५ रोजी सकाळी ठीक ११–०० वाजता केज नगरपंचायत कार्यालय येथे नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर या कार्यक्रमाचे उद्घाटन उपजिल्हा रुग्णालयाचे अधीक्षक डॉ.दत्तात्रय केंद्रे यांच्या हस्ते संपन्न होणार





आहे, दिनांक १६ जुलै २०२५ रोजी ठीक सकाळी११–०० वाजता नगरपंचायत कार्यालय केज येथे नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्या हस्ते उद्घाटन संपन्न होणार,दिनांक १७ जुलै २०२५ रोजी सकाळी ठीक ११–०० वाजता स्वामी समर्थ वर्धा आश्रम बोबडेवाडी रोड केज येथे वृद्धाश्रमातील महिलांना शाळेचे वाटप व अन्नदानाचा कार्यक्रम, दिनांक १८ जुलै २०२५ दाजी सकाळी ठीक ११–०० वाजता नगरपंचायत कार्यालय केज येथे संजय गांधी निराधार योजना लाभार्थी यांचे आधार ई–केवायसी कॅम्प, या कार्यक्रमाचे उद्घाटन केज तहसील चे तहसीलदार राकेश गुडे यांच्या हस्ते संपन्न होणार, दिनांक १९ जुलै २०२५ रोजी सकाळी ठीक १०–०० वाजता केज शहरातील सर्व शाळेतील गरीब मुलांना शालेय साहित्य वाटप, दिनांक २० जुलै २०२५ रोजी सकाळी ठीक ११–०० वाजता नगरपंचायत कार्यालय केज येथे बांधकाम मिस्तरी, बचत गट, छोटे व्यापारी, घरकुल धारक यांना त्यांच्या उपयोगी वस्तूंचे वाटप, या कार्यक्रमाचे उद्घाटन ज्येष्ठ स्त्री रोग तज्ञ डॉ.त्रिंबकराव चाटे यांच्या हस्ते संपन्न होणार, दिनांक २१ जुलै २०२५ रोजी सकाळी ठीक ११–०० वाजता नगरपंचायत कार्यालय केज येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी सदस्य नोंदणी अभियान, या कार्यक्रमाचे उद्घाटन हारुणभाई इनामदार यांच्या हस्ते संपन्न होणार, दिनांक २२ जुलै २०२५ रोजी सकाळी ठीक ११–०० वाजता जे के मंगल कार्यालय महात्मा फुले नगर केज येथे सर्व धर्मीय धर्मगुरूच्या व मान्यवरांच्या प्रमुख उपस्थित केज शहरात ५५५५ वृक्ष लागवडीचा शुभारंभ कार्यक्रमाचे उद्घाटन वृक्षप्रेमी तथा सिने अभिनेते सयाजीराव शिंदे यांच्या हस्ते संपन्न होणार आहे. तरी या आरोग्य, जनहित व पर्यावरण सेवा सप्ताह मध्ये केज शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सप्ताहाचा व आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन जेष्ठ नेते हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांनी केले आहे.

# बच्चू कडू यांच्यासह १२ जणांवर गुन्हा दाखल; जाणून घ्या नेमकं काय घडलं

प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष तथा माजी मंत्री बच्चू कडू शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नासाठी मैदानात उतरले आहे. बच्चू कडूंच्या पदयात्रेने संपूर्ण राज्यभराचे लक्ष वेधून घेतले. मात्र आता बच्चू कडू यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता आहे. राष्ट्रीय महामार्ग रोखून धरल्या प्रकरणी बच्चू कडूंसह १२ जणांवर यवतमाळच्या महागांव पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहे. बच्चू कडू यांच्या सातबारा कोरा पदयात्रेची समारोप सभा श्री गजानन महाराज मंदिर आंबोडा येथे नियोजित होती. मात्र ऐनवेळी आयोजकांनी व बच्चू कडू यांनी समारोप सभा आंबोडा उडान पुलावर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वर आयोजित केली. यावेळी ट्रॅक्टर महामार्गवर आडवे लावून वाहतूक पूर्णपणे बंद केली होती, यामुळे तीन तास दोन्ही बाजुची वाहतुक ठप्प झाली होती.

तसेच पदयात्रा संबंधाने आयोजकांनी कुठलेही कायदेशीर परवानगी घेतली नाही. आयोजकांनी बेकायदेशीर जमाव जमवून नियोजित ठिकाणी सभा न घेता ग्राम अंबोडा येथील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ३६१ वरील अंबोडा उड्डाण पुलावर ट्रॅक्टर आडवे करुन व ५००० ते ७००० लोकांना राष्ट्रीय महामार्गाच्यामध्ये बसवुन वाहतुक थांबविली. तसेच प्रतिबंधक आदेशाचे उल्लघंन केले. या प्रकरणी बच्चू कडूंसह १२ जणांवर गुन्हा नोंद करण्यात आल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

# केज नगरपंचायत येथे नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर संपन्न

केज/प्रतिनिधी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार व माजी मंत्री आ.धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर केज नगरपंचायत कार्यालयात संपन्न झाले. सप्ताह म्हणजे जनहिताचे काम आहे आहे असे प्रतिपादन नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांनी केले. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या संयुक्त वाढदिवसानिमित्त राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते हारूणभाई इनामदार व केज नगरपंचायत च्या नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्या मार्गदर्शनाखाली केज नगरपंचायत अंतर्गत आरोग्य, जनहित व पर्यावरण सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. दिनांक १५ जुलै २०२५ रोजी केज नगरपंचायत कार्यालय येथे नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर घेऊन सेवा सप्ताहास सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून उपजिल्हा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. दत्तात्रय केंद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती तर या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड, प्रमुख पाहुणे म्हणून गटनेते राजूभाई इनामदार, नगरसेविका सौ. पद्मिनी आक्का शिंदे, नगरसेवक खैसरभाई इनामदार, नगरसेवक अरुण अण्णा गुंड, नगरसेवक सुग्रीव कराड यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महामानवांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून धूप दिपानी पूजन करून वंदन करण्यात आले, यावेळी केज नगरपंचायत च्या वतीने उपस्थित मान्यवरांचे शाल,पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. यावेळी वैद्यकीय अधीक्षक डॉ. दत्तात्रय केंद्रे यांनी उपस्थित नागरिकांना व रुग्णांना आरोग्य विषयी मोलाचे मार्गदर्शन करून उपजिल्हा रुग्णालय केज येथे रुग्णांना देण्यात येणाऱ्या सुविधांची सखोल माहिती दिली. अध्यक्षीय समारोप प्रसंगी नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड म्हणाल्या की, धावपळीच्या जीवनामध्ये महिला व पुरुष स्वतःच्या काळजी कडे दुर्लक्ष करत आहेत म्हणून आम्ही जनहिताचे काम आमच्या हातून घडावे म्हणून आमचे नेते महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार व माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आरोग्य, जनहित व पर्यावरण सेवा सप्ताहाचे आयोजन केले आहे. पुढे बोलताना बनसोड म्हणाले की, जनसेवा हीच ईश्वर सेवा आहे हे ब्रीद वाक्य घेऊन आमचे नेते हारूणभाई इनामदार यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम केज शहरात राबवत आहोत या उपक्रमाच्या माध्यमातून शहरातील नागरिकांना व रुग्णांना याचा फायदा व्हावा या उद्देशाने उपक्रम घेत आहोत तरी या सेवा सप्ताह चा लाभ नागरिकांनी व रुग्णांनी मोठ्या संख्येने घ्यावा असे आवाहन देखील त्यांनी केले आहे. यावेळी उपजिल्हा रुग्णालयाचे नेत्रचिकित्सक डॉ. डोईफोडे मॅडम, कुलकर्णी सर,नेत्र चिकित्सक डॉ. पुसदेकर सर, रक्तपेढीचे वैज्ञानिक अधिकारी श्रीकृष्ण नागरगोजे, श्रीमती अनिता भांगे, तळेकर सर यांनी सदर नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर यशस्वी पार पाडले. यावेळी युवा नेते लखन हजारे, अशोक गायकवाड, पत्रकार विवेक बनसोड, अकबर इनामदार, सादेकभाई शेख, प्रेम मस्के यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पदाधिकारी,कार्यकर्ते, केज नगरपंचायत चे नगरसेवक, अधिकारी,कर्मचारी व नागरिक आणि रुग्ण मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# रिपब्लिकन सेनेचा हंडा मोर्चा सानपाडा वॉर्ड ऑफिसवर धडकला

नवी मुंबई / के. एच. हनवते :– दिनांक १४/७/२०२५ रोजी सानपाडा वॉर्ड ऑफिस वर रिपब्लिकन सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष. बहुजन हृदय सम्राट, तरुणांचे प्रेरणा स्थान, आनंदराज आंबेडकर साहेब यांच्या आदेशाने व आपले युवा नेते सन्माननीय अमन भाई आंबेडकर साहेब यांच्या नेतृत्वाखाली हंडा मोर्चा नेण्यात आला होता तुर्भे येथील हनुमान नगर या ठिकाणी काही समाजकंटक स्थानिक लोकप्रतिनिधी आकशापोटी बहुजन समाजातील वस्तीमध्ये पाण्याचा प्रेशर वाढू देत नाहीत दोन ते तीन महिने वारंवार वार्ड ऑफिसला जाऊन तक्रार दिल्यानंतरही बहुजन समाजाच्या एरियामध्ये पाणी येत नव्हतं शेवटचा पर्याय म्हणून आमचे युवा नेते एडवोकेट अमन आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली जोरदार मोर्चा नेण्यात आला या मोर्चाला सानपाड विभागातील विभागीय अधिकारी मोरे साहेब हे वेळेवर उपस्थित न राहिल्यामुळे त्यांनी आपले युवा नेते एडवोकेट अमन आंबेडकर साहेबांची जाहीर माफी मागितली व ज्या मागण्या केल्या होत्या त्या दहा दिवसात पूर्ण करतो असे लेखी आश्वासन दिले यालाच म्हणतात आंबेडकरांचा दणका. या मोर्चात प्रामुख्याने वीरेंद्र लगाडे जिल्हाध्यक्ष तसेच रिपब्लिकन सेनेचे सचिव विष्णू वासमणी, रिपब्लिकन सेना महिला जिल्हाध्यक्ष रेखाताई इंगळे, कार्याध्यक्ष दीपा बम, उपाध्यक्ष संगीता चौधरी, प्रमुख सल्लागार दिलीप बळसाने, आधी शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.




# नाश्त्यात तेलकट, तिखट पदार्थ खाऊन कंटाळा आला असेल तर सोप्या पद्धतीमध्ये घरी बनवा चविष्ट पिस्ता शेक

सकाळच्या नाश्त्यात सर्वच घरांमध्ये कांदापोहे, उपमा, शिरा, इडली, डोसा इत्यादी ठराविक पदार्थ बनवले जातात. तर कधी कधी बाहेरून विकत आणलेले पदार्थ नाश्त्यात खाल्ले जातात. मात्र तेलकट किंवा तिखट पदार्थ खाणे आरोग्यासाठी चांगले नाही. तेलकट पदार्थांच्या अतिसेवनामुळे शरीरात कोलेस्ट्रॉलची पातळी वाढण्याची शक्यता असते. हे आरोग्यासाठी अतिशय घातक आहे. म्हणूनच आज आम्ही तुम्हाला सकाळच्या नाश्त्यात पिस्ता शेक बनवण्याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. लहान मुलांपासून अगदी मोठ्यांपर्यंत सगळ्यांच्या आरोग्यासाठी पिस्ता अतिशय प्रभावी आहे. कारण कायम निरोगी आणि हेल्दी राहण्यासाठी आहारात ड्रायफ्रूट खाणे आवश्यक आहे. यामुळे शरीराला ऊर्जा मिळते आणि शरीर कायम निरोगी राहते. पिस्ता खाल्ल्यामुळे शरीराची कमी झालेली ऊर्जा वाढते आणि रोगप्रतिकारशक्ती सुधारण्यास मदत होते. चला तर जाणून घेऊया सोप्या पद्धतीमध्ये पिस्ता शेक बनवण्याची सोपी रेसिपी.

कोकणातील पारंपरिक पदार्थ! दुपारच्या जेवणात झटपट बनवा 'वालाची आमटी', नोट करून घ्या पारंपरिक रेसिपी

साहित्य: पिस्ता

दूध



साखर

वेलची पावडर

बर्फाचे तुकडे व्हॅनिला आईस्क्रीम

सजावटीसाठी पिस्ता शाळेचा डब्बा होईल आणखीनच स्पेशल! १० मिनिटांमध्ये सोप्या पद्धतीत बनवा गरमागरम देसी बर्गर, नोट करा रेसिपी

कृती: पिस्ता शेक बनवण्यासाठी सर्वप्रथम, पिस्ता सोलून वाटीमध्ये पाणी घेऊन त्यात भिजत ठेवा. त्यानंतर अर्धा तासाने पिस्ताची साल काढून घ्या.

मिक्सरच्या भांड्यात भिजवून घेतलेला पिस्ता, साखर, थंड दूध आणि वेलची पावडर घालून बारीक शेक तयार करून घ्या.

त्यानंतर त्यात बर्फाचे तुकडे आणि व्हॅनिला आईस्क्रीम घालून पुन्हा एकदा मिक्सरमधून फिरवून घ्या.

शेक बनवताना त्यात व्हॅनिला आईस्क्रीम टाकल्यास शेक आणखीनच क्रिमी आणि छान लागेल.

सर्व्ह करताना काचेच्या ग्लासात तयार केलेले पिस्ता शेक ओतून वरून पिस्त्याचे बारीक तुकडे टाकून सजावट करा.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले पिस्ता शेक. हा पदार्थ लहान मुलांना खूप जास्त आवडेल.

# प्रवाशांच्या खिशातील पैसे चोरणाऱ्याला स्थानिक गुन्हे शाखेकडून अटक. ०१ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त.

लातूर:–प्रवाशांच्या खिशातील पैसे चोरणाऱ्याला स्थानिक गुन्हे शाखेकडून अटक. ०१ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त.

बस मधून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या खिशातील रोख रक्कम चोरणाऱ्या गुन्ह्यातील आरोपीला अटक. पन्नास हजार रोख रकमेसह गुन्ह्यात वापरलेली मोटरसायकलसह एकूण ०१ लाख २५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त. पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी.



याबाबत थोडक्यात माहिती अशी की,पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण, यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांचे नेतृत्वात पोलीस अधिकारी/अमलदारांचे पथक चोरीच्या गुन्ह्याचा तपास करीत आहेत. सदर पथकामार्फत जिल्ह्यातील विविध गुन्हेगारांची माहिती एकत्र करून त्याचे विश्लेषण करण्यात येत होते. तसेच गोपनीय बातमीदार नेमून त्यांच्याकडून माहिती घेण्यात येत होती.

दरम्यान १३/०७/२०२५ पोलीस पथकाला मिळालेल्या गोपनीय माहितीवरून बस मधील प्रवाशांच्या खिशातील पैसे चोरणारा संशयित इसम उदगीर मधील एका हॉटेल समोर मोटरसायकलसह थांबलेला असल्याची माहिती मिळाली. त्यावरून स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तात्काळ सदर ठिकाणी रवाना होऊन रोडवर थांबलेल्या इसमास ताब्यात घेऊन विचारपूस केली असता त्याने त्यांचे नाव सचिन मधुकर कसबे वय ३१ वर्ष राहणार जय नगर लातूर. असे असल्याचे सांगितले. त्याच्या ताब्यातील मोटर सायकलची झडती घेतली असता नमूद गाडीच्या डिग्गीमध्ये ५० हजार रुपयाची रोख रक्कम मिळून आली. सचिन कसबे याला विश्वासात घेऊन नमूद रक्कमबाबत विचारपूस केली असता त्याने काही महिन्यापूर्वी सदरची रक्कम उदगीर बसस्थानक मधून प्रवास करणाऱ्या प्रवाशाच्या खिशातून चोरी केल्याचे कबूल केले. पोलीस ठाणे उदगीर शहर च्या अभिलेखाचे पाहणी केली असता पोलीस ठाणे येथे उदगीर बसस्थानक मधून रोख रक्कम चोरीला गेल्याच्या गुन्हा दाखल असल्याचे समोर आले

नमूद आरोपीने वर गुन्ह्यात चोरलेली रोख रक्कम ५० हजार रुपये व गुन्ह्यात वापरलेली मोटरसायकल असा एकूण ०१,२५,००० /– रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस ठाणे उदगीर शहर हे करीत आहेत.

सदरची कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात पोलीस उप–निरीक्षक संजय भोसले,पोलीस अमलदार संजय कांबळे, योगेश गायकवाड, सूर्यकांत कलमे, तुळशीराम बरुरे, चालक पोलीस अमलदार चंद्रकांत केंद्रे यांनी केली आहे.

## राज्य शासनाच्या 'उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार २०२४'साठी प्रवेशिका पाठविण्याकरिता १९ जुलै पर्यंत मुदतवाढ

लातूर :– माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत उत्कृष्ट पत्रकारिता, उत्कृष्ट लेखन, उत्कृष्ट दूरचित्रवाणी वृत्तकथा, उत्कृष्ट छायाचित्रकार, समाज माध्यम आणि स्वच्छता अभियानाबाबत केलेल्या जनजागृतीपर लेखनासाठी पुरस्कार स्पर्धा जाहीर करण्यात आली आहे. या स्पर्धेसाठी दिनांक १ जानेवारी, २०२४ ते ३१ डिसेंबर, २०२४ पर्यंतच्या कालावधीत प्रसिद्ध झालेल्या लेखन/छायाचित्रे/वृत्तकथा यांच्या प्रवेशिका मागविण्यात आल्या आहेत. प्रवेशिका पाठविण्याचा अंतिम दि. ३१ जानेवारी, २०२५ असा होता. आता या पुरस्कारासाठी प्रवेशिका मागविण्याकरिता दि. १९ जुलै, २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

राज्यातील विविध भागातील स्पर्धकांनी संबंधित जिल्हा माहिती कार्यालयाकडून तर मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्ह्यातील इच्छुकांनी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, तळमजला, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई–३२, येथून विहित नमुन्यातील अर्ज प्राप्त करुन घ्यावयाचे आहेत. अर्जाचे नमुने http://dgipr.maharashtra.gov.in/ या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

# सर्व भाषांची जननी ही पाली भाषा होय – ॲड. प्रज्ञेश सोनवणे

मुंबई :– सम्राट अशोकाच्या कालखंडात महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली नव्हती भारत हा अनेक प्रांत, विभाग यात विखुरलेला होता पाकिस्तान, सिलोन, ब्रम्हदेश ते अफगाणिस्तान पर्यंतच्या भूभागावर चक्रवर्ती सम्राट अशोकाची एकहाती सत्ता होती, त्या सम्राट अशोकाच्या काळातील बोलीभाषा पाली होती आता अडीच हजार वर्षांनंतर बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्याला बौद्ध धम्म दिला त्यानंतर आपल्याला खऱ्या अर्थाने पाली भाषेची ओळख होऊ लागली आणि या पाली भाषेतूनच सध्या बोलल्या जाणाऱ्या अनेक भाषा निर्माण झाल्या आहेत, पाली भाषेतील अनेक शब्द मराठी व इतर भाषेत प्रचलित आहेत परंतु पाली भाषेचा अर्थ आपण समजून घेत नाही त्यामुळे त्याचा विपर्यास केला जातो उदाहरणार्थ भगवा आतंकवाद यातील भगवा हा मूळ पाली भाषेतील शब्द आहे असे अनेक पाली भाषेतील शब्द दैनंदिन बोलीभाषेत वापरले जातात परंतु त्याची माहिती नसल्याने त्या शब्दांचा विपर्यास केला जातो हे कुठं तरी थांबलं पाहिजे, धम्म आणि धर्म हे वेगवेगळे प्रवाह असून धम्माचे विचार, आचारसंहिता ही माणसाने माणसाशी कस वागावं यावर







अवलंबून असून धर्म हा दांभिकता, भीती, अंधश्रद्धा यावर आधारित आहे व तीच अराजकता आता धम्मा मध्ये घुसू पाहत आहे असे प्रतिपादन वर्षावास प्रवचन मालिकेच्या दुसऱ्या पुष्पात 'बौद्ध धम्म आणि आपली जबाबदारी' या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून बोलत असताना ऍड. प्रज्ञेश चैतन्य सोनवणे यांनी केले. बौद्धजन पंचायत समिती संलग्न संस्कार समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा या वर्षावास प्रवचन मालिकेचे दुसरे पुष्प उपसभापती आनंदराज आंबेडकर विनोद मोरे यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक सभागृह, परेल, मुंबई – १२ येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाले, सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्कार समितीचे सरचिटणीस मनोहर बा. मोरे यांनी आपल्या पहाडी व प्रभावी आवाजात केले, तसेच संस्कार समितीचे अध्यक्ष मंगेश पवार यांनी पाहुण्यांची ओळख करून देत असताना ऍड. प्रज्ञेश चैतन्य सोनवणे यांच्या जीवनप्रवासावर प्रकाश टाकीत कार्यक्रमाची रूपरेषा व प्रास्ताविक सादर केले. बौद्ध धम्म व धार्मिक विधीचे गाडे अभ्यासक विनोद मोरे यांनी अध्यक्षीय भाषणात बौद्ध धम्म आणि आपली जबाबदारी या विषयाचा आढावा घेत असताना त्यांनी अनेकविध उदाहरण देऊन समाजात कश्या प्रकारची जागरूकता निर्माण करायला हवी अश्या अत्यंत मौलिक सूचना त्यांनी उपस्थितांना केल्या, भैय्यासाहेबांनी बौद्धाचार्यांची निर्मिती का केली ? उपासक, उपसिकांचे कार्य व कर्तव्ये कोणती यावर प्रकाश टाकीत सर्वांना मौलिक अशी माहिती दिली. संस्कार समिती ही न चुकता शिस्तबद्ध व नियोजनपूर्वक वर्षावास प्रवचन मालिकेचे आयोजन करते त्याबद्दल त्यांचे कौतुक केले. सदर कार्यक्रमास समितीचे कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत, माजी कार्याध्यक्ष किशोर मोरे, उपकार्याध्यक्ष मनोहर सखाराम मोरे, एच. आर. पवार, अतिरिक्त चिटणीस विठ्ठल जाधव, श्रीधर जाधव, चिटणीस रवींद्र शिंदे, अनिरुद्ध जाधव, महेंद्र पवार, राजाभाऊ तथा रामदास धो. गमरे, तुकाराम घाडगे, अतुल साळवी, यशवंत कदम, जेष्ठ पत्रकार गुणाजी काजिर्डेकर, आनंद जाधव, महिला मंडळाच्या सुशीलाताई जाधव आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सरतेशेवटी यावर्षी काळाच्या पडद्याआड गेलेल्या बौद्धाचार्यांना साश्रु नयनांनी मूक श्रद्धांजली अर्पण केली तद्नंतर सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे व उपस्थितांचे संस्कार समितीचे सरचिटणीस मनोहर बा. मोरे यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# धम्मदिप सांस्कृतिक कलामंचच्या वतीने गरजू विध्यार्थ्यांना शालेयपयोगी वस्तूंचे वाटप

बदलापूर/ प्रतिनिधी :– सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात नेहमीच अग्रेसर राहून सामजिक बांधिलकी जपणारी दापोली तालुक्यातील अग्रगण्य संस्था म्हणजे धम्मदीप सांस्कृतिक कलामंच, सर्वच क्षेत्रातील सर्वच स्तरातील गरजू, उद्यमी व होतकरू लोकांच्या पाठीशी उभी राहून त्यांना आधार देण्याचे महत्कार्य धम्मदीप सांस्कृतिक संस्थेच्या वतीने नेहमीच करण्यात येते त्याच अंतर्गत बदलापूर मुळगाव येथील गरीब, गरजू व शिक्षणाची कास धरणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांना शालेयपयोगी साहित्य, वह्या, पुस्तके, दप्तर, छत्री यांचे मोफत वाटप संस्थेचे अध्यक्ष अरविंद रुके यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. सदर प्रसंगी अध्यक्ष अरविंद रूके , उपाध्यक्ष विनोद धोत्रे, उपाध्यक्ष दिनेश सावंत, सरचिटणीस अमरदिप






जाधव, सहचिटणीस नितेश कासारे, कोषाध्यक्ष संगम जाधव, विनोद रूके (बोंडीवली) आदी मान्यवर उपस्थित होते त्या सर्वांच्या उपस्थितीत शालेयपयोगी वस्तूंचे वाटप करून आपण निसर्गाचे देणे लागतो या उदात्त विचारातून वृक्षारोपणाचा कार्यक्रम ही सर्वांच्या उपस्थितीत पार पडला. सदर प्रसंगी अध्यक्ष अरविंद रुके यांनी सर्वाना वृक्षारोपणाचे महत्व पटवून दिले व सदर कार्यक्रमास आर्थिक सहाय्य करून योगदान देणाऱ्या सर्व दानी व्यक्तींचे मनापासुन आभार व्यक्त केले, तसेच सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी अथक परिश्रम घेणाऱ्या सर्वांचे, शालेय मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी, ग्रामस्थ तसेच विनोद धोत्रे, वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी सागर जाधव यांचे विशेष आभार व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता केली.

# केज शहरात गुरुकृपा योगा अकॅडमीचा शुभारंभ


केज/प्रतिनिधी -- केज शहरामध्ये कानडी रोड येथे गुरुकृपा योगा अकॅडमीचा शुभारंभ दि.१५–०७–२०२५ मंगळवार रोजी रामकृष्ण परमहंस परिवाराच्या गुरुमाई खंदारे आईंच्या हस्ते करण्यात आला.या शुभारंभ कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. उत्रेश्वर जाधव सर होते,तर प्रमुख पाहुणे म्हणून दिपा काटे,सपना शर्मा,उमा वळसे या उपस्थित होत्या.गुरुकृपा योगा अकॅडमीच्या संचालिका सुवर्णा शेटे यांनी प.पू. खंदारे गुरुजीं पासून प्रेरणा घेऊन योगाभ्यासाचे अध्ययन केले. संचालिकांनी प्रास्ताविकात सांगितले की,सध्याच्या धावपळीच्या जीवन शैलीत महिला पुरुष व बालकांचे आरोग्य,मनस्वास्थ अस्थिर झालेले आहे.प्रत्येकाला स्वतःचे जीवन सुस्थिर करण्यासाठी योग साधना खुप महत्वाची आहे.योग साधने द्वारे प्रत्येकाने स्वतः सह कुटुंबाच्या आयुष्यात आमुलाग्र बदल होतात. असे प्रतिपादन केले.याप्रसंगी प्रमुख पाहुण्या दिपा काटे यांनी मनोगत व्यक्त केले.तर अध्यक्षीय समारोप उत्रेश्वर जाधव सरांनी केला. यावेळी महिला पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.




## महापालिकेच्या निवडणुकीसाठी काँग्रेसची तयारी सुरू; लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीकडून झोन प्रमुखांच्या नियुक्त्या.

लातूर / प्रतिनिधी :– लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक पार्श्वभूमीवर पक्ष संघटन वाढिसाठी शहरातील वेगवेगळ्या झोनकरिता पक्षातील झोनप्रमुखांची नियुक्ती करीत निवडणुकीची तयारी सुरू केलीय. आगामी काळात महाराष्ट्रातील महानगरपालिका, जिल्हा परिषद,पंचायत समिती निवडणुकांचे बिगुल वाजण्याची चिन्हे असून प्रशासन प्रभाग रचना व अन्य निवडणूक पूर्व कामात व्यस्त झाले असून लातुरात काँग्रेस पक्षाकडून देखील लातूर महापालिका निवडणुकीसह जिल्हा परिषद तसेच पंचायत समिती निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर पक्ष संघटन वाढीच्या दृष्टीने तयारी सुरू कली आहे. याचाच एक भाग म्हणून काँग्रेस पक्षाचे प्रांताध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ,राज्याचे माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख,राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातूरचे आमदार अमित विलासराव देशमुख तसेच लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे चेअरमन माजी आमदार धिरज देशमुख यांच्या सूचनेनुसार लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ड.किरण जाधव यांनी लातूर शहरातील काँग्रेस पक्षाचे झोन प्रमुखांची नियुक्ती केली आहे. यामध्ये लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या अल्पसंख्यांक विभागाचे अध्यक्ष ड.फारुक शेख यांची झोन अ च्या प्रमुख पदी नियुक्ती केली गेली आहे या झोनमध्ये प्रभाग १,२,७,८,९ या







प्रभागांचा समावेश आहे, माजी उपमहापौर कैलास कांबळे यांना झोन ब च्या प्रमुख पदी जबाबदारी दिली असून या झोन मध्ये प्रभाग ३,४,५,६ समाविष्ट आहेत,तर पश्चिम भागातील सामाजिक कार्यकर्ते,उद्योजक सूर्यकांत कातळे यांची झोन क च्या प्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली आहे या झोन मध्ये प्रभाग १०,११,१२,१३,१४ या प्रभागांचा समावेश असून प्रभाग १५,१६,१७,१८ चा समावेश असलेल्या झोन ड करिता झोन प्रमुख निवड लवकरच करण्यात येणार आहे अशीही माहिती देण्यात आली. लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीकडून निवड करण्यात आलेल्या या झोन प्रमुखांच्या निवडीचे स्वागत होत असून लातूर काँग्रेस सर्व ताकतीनिशी आगामी महापालिकेच्या निवडणुकीला सामोरे जात लातूर महानगरपालिकेवर काँग्रेसचा तिरंगा फडकणार असा विश्वास लातूर शहर जिल्हाध्यक्ष ड किरण जाधव यांनी व्यक्त केला आहे.

# केज शहरातील सर्व शिधापत्रिकाधारकांनी दोन महिन्याचे एकत्रित धान्य घ्यावे-श्रीमती सुजाता रामटेके

केज/प्रतिनिधी केज शहरातील सर्व शिधापत्रिका धारकांनी शहरातील रेशन दुकानदार यांच्याकडून दोन महिन्याचे धान्य एकत्रित घ्यावे असे आवाहन केज तहसील चे तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या मार्गदर्शनाखाली पुरवठा निरीक्षण अधिकारी श्रीमती सुजाता रामटेके यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे. याबाबतची सविस्तर माहिती अशी की, शासन निर्देशानुसार माहे जून २०२५, जुलै २०२५ आणि ऑगस्ट २०२५ या तीन महिन्याचे धान्य एकत्रित वितरण करण्यात येणार होते. परंतु त्यापैकी माहे जून २०२५ चे धान्य हे धान्य दुकानदार यांच्यामार्फत शिधापत्रिका धारकांना वितरण करण्यात आलेले आहे. जून महिन्याचे धान्य वितरण करण्यात आले असल्यामुळे केज शहरा अंतर्गत येणाऱ्या स्वस्त धान्य दुकानदार यांच्याकडून उर्वरित दोन महिन्याचे म्हणजेच जुलै व ऑगस्ट या महिन्याचे धान्य हे केज शहरातील शिधापत्रिका धारकांना केज शहरा अंतर्गत स्वस्त धान्य दुकानदारा मार्फत वितरित करण्यात येत असून दोन महिन्याचे धान्य हे जुलै २०२५ मध्येच एकत्रित वितरण होणार आहे. त्यामुळे फक्त केज शहरा अंतर्गत येणाऱ्या लाभार्थ्यांनी वरील दोन महिन्याचे रेशन धान्याचा एकत्रित लाभ घेण्यात यावे असे आवाहन केज तहसीलदार राकेश गिड्डे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येत




आहे असे प्रसिद्धी पत्रकार द्वारे पुरवठा निरीक्षण अधिकारी श्रीमती सुजाता रामटेके यांनी केले आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE